नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून करण्यात येणा-या विकास कामांच्या दर्जाची त्रयस्थ यंत्रणेकडून तांत्रिक लेखापरीक्षणाची सुधारीत व्यवस्था अंमलात आणण्याबाबत सुधारणा.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.३३५/नवि-३३
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १८ जून, २०१९

संदर्भ :-

शासन निर्णय नगर विकास विभाग क्रमांक दिनांक २८.०३.२०१८ व दिनांक ११.०५.२०१८.

शासन निर्णय :-

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून करण्यात येणाऱ्या विकास कामांच्या दर्जाचे त्रयस्थ यंत्रणेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करण्यासाठी नामिका सूचीवर घेतलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालये व शासकीय तंत्रनिकेतने यांच्या यादीत खालीलप्रमणे अभियांत्रिकी महाविद्यालये/ तंत्रनिकेतने यांचा समावेश करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

०२. समक्रमांकाच्या दिनांक २८ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ५ (I) नुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत प्रकल्पातील कामांच्या तांत्रिक लेखापरीक्षणासाठी त्या शासन निर्णया सोबतच्या **प्रपत्र-अ मधील विहित नामिका सूचीमध्ये** Visvesvaraya National Institute of Technology (VNIT), Nagpur **या संस्थेचे नाव समाविष्ट करण्यात येत आहे**.

०३. तसेच, VNIT या संस्थेचे नाव त्या शासन निर्णयाच्या प्रपत्र-क मध्ये देखील समाविष्ट आहे. त्यामुळे दिनांक २८ मार्च, २०१८ शासन निर्णयाच्या परिच्छेद ५ (III) नुसार दुसऱ्या टप्प्यावरील तांत्रिक लेखापरीक्षणाचे आदेश शासन स्तरावरुन/आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्या स्तरावरुन देताना, **जेथे पहिल्या टप्प्याचे लेखापरीक्षण VNIT या संस्थेमार्फत केलेले असेल** अशाबाबत **दुसऱ्या टप्प्याचे लेखापरीक्षण** त्या शासन निर्णयाच्या **प्रपत्र-क मधील VNIT संस्था वगळून उर्वरित दोन संस्थांपैकी एका संस्थेमार्फत करण्यात यावे**.

०४. समक्रमांकाच्या दिनांक २८ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयातील परिच्छेद २ (अ) नुसार पहिल्या टप्प्यातील त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षणासाठी **प्रपत्र-ब मध्ये विहित यादीत खालील दोन शासकीय तंत्रनिकेतनांचा समावेश करण्यात येत आहे.**

I) शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव

II) शासकीय तंत्रनिकेतन, मालवण

०५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१८१७०७२३१२२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pandurang Jotiba Jadhav

Digitally signed by Pandurang Jotiba Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=300d785e12fdc19db0612f1ffdf83e54efe7da2b1bc63d18df8e09b3c7eece65, cn=Pandurang Jotiba Jadhav
Date: 2019.06.18 20:57:20 +05'30'

(पां. जो. जाधव)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव
३. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव नगर विकास विभाग (२) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
७. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय, मुंबई.
८. महालेखापाल कार्यालय, महाराष्ट्र १/२ मुंबई/नागपूर.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०. अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई उपनगर.
११. सर्व विभागीय आयुक्त
१२. सर्व जिल्हाधिकारी
१३. अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान, मुंबई
१४. आयुक्त, सर्व महानगरपालिका
१५. मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा
१६. मुख्याधिकारी, सर्व नगरपंचायती
१७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१८. निवडनस्ती, (नवि-३३)